

मोतीलाल

उत्कृष्ट अभिनय, दारूचं व्यसन, जुगार-रेस यांसारखे छंद, लग्नेतर संबंध, चित्रपटनिर्मिती... पंचावन्न वर्षांच्या जीवनात इतकं सगळं करणारे मोतीलाल शहर की लडकी, डॉ. मधुरिका, कुलवधू, होली, देवदास, जागते रहो, अनाडी आणि पैगामसारख्या अनेक चित्रपटांतून आपल्या सशक्त अभिनयाच्या जोरावर इंडस्ट्रीत अजरामर झाले. 'मी अभिनय करत नाही, ती भूमिका जगतो.' असं मोतीलाल नेहमी म्हणत. आयुष्याच्या अखेरीस दारिद्र्य, उपेक्षा, शारीरिक आणि आर्थिक हलाखी यामुळे खचलेल्या मोतीलालना अखेरच्या दिवसांत जागते रहोमधलं हे गीत आठवलं असेल: 'जिंदगी ख्वाब है...'